ePaper

## भारत आणि फ्रान्समध्ये विशेष धोरणात्मक भागीदारी



| वर्ष - 9 | अंक - 173 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार | दि. 18 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पुण्यात 'फॅक्टरी ऑफ द फ्युचर'!

## अजित पवार यांच्या विमान अपघातात खळबळजनक माहिती समोर

# फ्लाईट रेकॉर्डर जळाले

**महाईन्यूज । मुंबई**

**अजित पवार यांच्या विमान अपघात तपासाबाबत मोठी बातमी समोर येत आहे. अजित पवार यांच्या अपघात झालेल्या विमानात दोन स्वतंत्र फ्लाईट रेकॉर्डर होते. या दोन स्वतंत्र फ्लाईट रेकॉर्डरबाबत AAIB कडून महत्वाची माहिती देण्यात आली आहे. एअरक्राफ्ट एक्सिडेंट इन्वेस्टिगेशन ब्युरो (AAIB) ही भारतातील विमान अपघाताची चौकशी करणारी संस्था आहे. त्यांनी अजित पवार यांच्या विमानातील हे दोन्ही स्वतंत्र फ्लाईड रेकॉर्डर हे पूर्णपणे जळाले असल्याचं सांगितलं.**




AAIB ने पुढं सांगितलं की, अजित पवार यांच्या विमान अपघातातील तपासात तांत्रिक आणि प्रक्रियात्मक नियमांचे काटेकोरपणे पालन केलं जात आहे. तपास योग्य दिशेनं सुरू आहे. अपघातासंदर्भातील तर्क वितर्क टाळून प्रक्रिया नियमानुसार तपास करण्यासाठी सहकार्य करण्याची विनंती देखील AAIB कडून करण्यात आली आहे.

AAIB ने पुढे सांगितलं की, ज्यावेळेला विमानाचा विमान लँडिंग करताना जो ब्लास्ट झाला होता त्यानंतर मोठी आग लागलेली लागलेली होती घटनास्थळावर आणि त्यावेळेमध्ये सगळं जळून खाक झालेलं होतं त्यानुसार दोन्ही फ्लाईट रेकॉर्डर हे तीव्र उष्णतेच्या संपर्कात आल्यामुळे ते पूर्णपणे जळून खाक झालेले आहेत पण दुसरी महत्त्वाची गोष्ट हीच आहे की एका लॅब मध्ये त्याचा जो डेटा होता तो रिकव्हर करण्यात यश आलं आहे. आता जी काही त्याची माहिती आहे ती कलेक्ट करण्याची जी प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी विशेष देशातून माहिती घेण्यात येत आहे. यावेळी तो देश कोणता याचा मात्र उल्लेख करण्यात आलेला नाही.

### त्या देशाच्या उल्लेख नाही

मिळालेल्या माहितीनुसार, 'ज्यावेळेला एक्सिडेंट झालेला होता विमानाचा त्यानंतर तात्काळ हे सगळं प्रकरण एआयबी कडे देण्यात आलेलं होतं. एअरक्राफ्ट एक्सिडेंट इन्वेस्टिगेशन ब्युरो (AAIB) आणि त्यांच्या वतीने हे स्पष्टीकरण देण्यात आलेल आहे की त्या फ्लाईट मध्ये दोन स्वतंत्र फ्लाईट रेकॉर्डर होते आणि ते दोन्ही दोन्ही रेकॉर्डर जे आहेत ते तीव्र उष्णतेच्या संपर्कात आले त्यामुळं त्यांच मोठं नुकसान झालं होतं.

### काय म्हणाले AAIB ?

AAIB ने अजित पवार यांच्या विमान अपघात तपासात डेटा मिळवण्यासाठी स्वतंत्र सहकार्य घेणार असल्याचं सांगितलं आहे. त्यांनी जरी प्रचंड मोठ्या आगीमुळं अजित पवार यांच्या विमानातील दोन्ही फ्लाईट रेकॉर्डर हे पूर्णपणे जळाले असले तरी फ्लाईट रेकॉर्डर लॅबमध्ये यातील डेटा डाऊनलोड करण्यात यश मिळालं आहे. या संवेदनशील प्रकरणात अप्रमाणित माहिती प्रसारित करू नये, अशी विनंती विमान अपघात तपास संस्थेने सर्व संबंधित घटकांना केली.



# पुण्यात 'फॅक्टरी ऑफ द फ्युचर'!

## आघाडीच्या तंत्रज्ञान कंपनीची ६५३ कोटींची गुंतवणूक




**महाईन्यूज । पुणे**

**देशात माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि उत्पादन क्षेत्रात अग्रेसर असलेल्या पुण्यात आता अत्याधुनिक 'फॅक्टरी ऑफ द फ्युचर'ची उभारणी केली जाणार आहे. यासाठी एसकेएफ इंडिया ही आघाडीची कंपनी ६५३ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. ही नवीन उत्पादन सुविधा २०३० पर्यंत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. या निमित्ताने पुण्यातील निर्मिती क्षेत्राने अत्याधुनिक पाऊल टाकले आहे.**

उद्योगांसाठी तंत्रज्ञान व उपाययोजना पुरवणारी कंपनी एसकेएफ इंडियाने पुण्यात अत्याधुनिक 'फॅक्टरी ऑफ द फ्युचर' उभारण्यासाठी ६५३ कोटी रुपयांची गुंतवणूक जाहीर केली आहे. नवीन उत्पादन सुविधा 'लीन', 'क्लीन' आणि पूर्णपणे डिजिटल पायाभूत सुविधांनी सुसज्ज असा असेल.

या प्रकल्पात बुद्धिमान प्रणाली, रिअल-टाइम डेटा विश्लेषण, ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान आणि स्वयंचलित उत्पादन प्रक्रिया यांचा समावेश असेल. त्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता, वेग, अचूकता आणि कार्यक्षमता यामध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. ही उत्पादन सुविधा २०३० पर्यंत सुरू होणार असून, भारतातील कंपनीच्या प्रगत उत्पादन क्षमतेला नवे बळ मिळणार आहे.

कंपनीच्या दीर्घकालीन धोरणानुसार हा प्रकल्प केवळ उत्पादनवाढीपुरता मर्यादित नसून, अधिक सक्षम, लवचिक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उत्पादन साखळी निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. याबाबत कंपनीचे मॅन्युफॅक्चरिंग ऑपरेशन्स संचालक सुजीत पै म्हणाले की, भारत सध्या उत्पादन क्षेत्रात महत्त्वाच्या टप्प्यावर उभा आहे आणि एसकेएफ इंडिया इंडस्ट्रियल या संधीचा लाभ घेत आघाडीवर राहील.

'फॅक्टरी ऑफ द फ्युचर' पूर्णपणे डिजिटल आणि शाश्वत तत्त्वांवर आधारित असेल. ऊर्जा बचत, स्थानिक उत्पादनवाढ आणि मजबूत पुरवठा साखळी (यावर विशेष भर देण्यात येणार आहे. त्यामुळे भारत जागतिक उत्पादन केंद्र म्हणून अधिक सक्षम होईल.अशी माहिती संबंधित सूत्रांकडून देण्यात आली.

### पुण्यातील उत्पादन क्षेत्राला बळ

पुण्यात कंपनीची आधीपासूनच भक्कम उपस्थिती आहे. नवीन प्रकल्पामुळे विद्यमान उत्पादन सुविधांचे एकत्रीकर करण्यात येणार असून, त्यात नवीन सुविधांची भर घालण्यात येणार आहे. यातून अधिक विस्तारक्षम उत्पादन संरचना उभारली जाणार आहे. ऊर्जा, रेल्वे, धातू व खाण तसेच इतर अवजड उद्योग क्षेत्रांना जलद सेवा देण्यासाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे. देशात वाढत्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर या क्षेत्रांना उच्च दर्जाचे, वेगवान आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध उत्पादन महत्त्वाचे ठरणार आहे.

## जनगणनेला मिळाला मुहूर्त; जिल्हा प्रशासनाने केलं स्पष्ट

**महाईन्यूज । पुणे**

**देशभरात पुढील वर्षापासून जनगणना केली जाणार आहे. मार्च महिन्यात त्याची सुरुवात होणार असून, यासाठी पूर्वतयारी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पूर्वतयारी म्हणून विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात जनगणनेच्या पहिल्या टप्प्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली.**




निवासी उपजिल्हाधिकारी आणि जिल्हा जनगणना अधिकारी ज्योती कदम यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीच्या (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) माध्यमातून ही बैठक झाली. जिल्ह्यातील तहसीलदार, कटक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपंचायत, नगरपालिकांचे मुख्य अधिकारी या वेळी उपस्थित होते.

जनगणनेचे काम अद्ययावत मोबाइल ॲपचा वापर करून केले जाणार आहे. प्रगणक, पर्यवेक्षकांच्या मोबाइलमध्ये हे ॲप डाउनलोड केले जाणार आहे. पुणे जिल्ह्यात १६ मे ते १५ जून या काळात घरगटांची यादी तयार करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी ही माहिती दिली. कदम म्हणाल्या, 'जनगणनेचे काम कसे करावे, याचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सरकारने जनगणनेबाबत मनुष्यबळ उपलब्ध करण्याबाबत नियुक्ती करण्यासंदर्भात अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार आवश्यक त्या मनुष्यबळाची नियुक्ती केली जाणार आहे. जनगणनेसाठी घरांची यादी तयार करायची आहे. ७०० ते ८०० लोकसंख्या असलेल्या १८० ते २०० घरांना एक ब्लॉक मानले जाईल. एका ब्लॉकला एक प्रगणक नियुक्त करण्यात यावा. सहा प्रगणकांवर एक पर्यवेक्षकाची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी कर्मचारी, अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यांना जनगणनेसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण देखील देण्यात येणार आहे. त्याचे नियोजन सुरू झाले आहे. जनगणना अत्यंत महत्वाचे काम असल्याने यामध्ये कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी खबरदारी घेतली जात आहे. जिल्ह्यात १३ तालुका, १४ नगरपालिका, नगर परिषदा, दोन महानगरपालिका, तीन कटक मंडळांच्या ३१ डिसेंबरला सीमा निश्चित करण्यात आल्या आहेत. घरगट यादी तयार करताना भौगोलिक सीमा, नव्याने स्थापन झालेल्या वसाहती, स्थलांतरित कुटुंबे यांची योग्य नोंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# निळ्या अन् लाल पूररेषांचे होणार पुन:सर्वेक्षण!

## आमदार शंकर जगताप यांच्या पाठपुराव्याला यश; 12 सदस्यांची समिती करणार

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भात केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये नद्यांलगतच्या निळ्या व लाल पुररेषेचे नव्याने पुनर्वेक्षण करण्यासाठी शासनाकडून नियमावली तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी सरकारने पिंपरी चिंचवडसह १२ सदस्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली. दरम्यान गठीत केलेली समिती पुढील दोन महिन्यात शासनाला अहवाल सादर आहे.**



> भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून नागरिकांच्या हिताचे आणि सुविधेचे निर्णय घेतले जात आहे. निळ्या, लाल पूररेषांचे पुन:सर्वेक्षण हा त्यापैकीच एक निर्णय आहे. १० जानेवारी रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी 'फ्लड मेटिगेशन मेजर्स' नुसार कोल्हापूरच्या धर्तीवर नवा युडीसीपीआर केला जाईल असे आश्वासन दिले होते. महिन्याभरात या आश्वासनाची पूर्तता होत आहे. निळ्या आणि लाल पूररेषांबाबत शासनाने पुनःसर्वेक्षणासाठी समिती गठीत करण्याचा घेतलेला निर्णय हा पिंपरी-चिंचवडसह राज्यातील नागरिकांसाठी दिलासा देणारा आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नामुळे बांधकाम परवानग्या, पुनर्विकास आणि मालमत्ता धारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. नव्या सर्वेक्षणामुळे नियमांमध्ये सुस्पष्टता येऊन नागरिकांचा संभ्रम दूर होण्यास मदत होईल.
>
> - शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.

पिंपरी चिंचवडसह राज्यात प्रमुख शहरांमध्ये नद्यालगतच्या निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भातले प्रश्न प्रलंबित आहेत. यामुळे नागरिकांना अडचणी निर्माण होत होत्या. पिंपरी चिंचवड मधील पवना, इंद्रायणी आणि मुळा नद्यांच्या निळ्या पूररेषेत झालेली अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामे हा मुख्य प्रश्न आहे. यासाठी आमदार शंकर जगताप यांच्या माध्यमातून वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दि २५ मार्च २०२५ रोजी (लक्षवेधी सूचना क्रमांक १९४६ ) मांडतांना उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे समिती नेमण्याची मागणी केली होती. दरम्यान नुकत्याच झालेल्या पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले होते. १० जानेवारी २०२६ रोजी आकुर्डी येथे झालेल्या सभेमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील निळ्या आणि लाल पूररेषेसंदर्भात नव्याने सर्वेक्षण केले जाईल असे सांगितले होते. याबाबतीत आमदार शंकर जगताप यांनी पाठपुरावा सुरूच ठेवला होता. या पाठपुरावाला मोठे यश मिळाले आहे.

आमदार शंकर जगताप म्हणाले शासनाकडून राज्यातील नद्यांलगतच्या निळ्या व लाल पूररेषांचे नव्याने पुन:सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नगर विकास विभागाचे उपसचिव प्रणव करपे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. निळ्या आणि लाल पूर रेषेचा प्रश्न युनिफाईड डीसीपीआर मुळे निर्माण झाला आहे. यामुळे नदीलगतच्या अनेक भागांमध्ये नवीन डेव्हलपमेंट थांबलेली आहे. निळी आणि लाल पुरेषा ही शंभर वर्षांपूर्वीच्या गृहीतकांवर आधारित आहे. त्यामुळे यामध्ये बदल होणे, नव्याने सर्वेक्षण होणे आवश्यक होते. यासाठी वेळोवेळी मागणी केली. या मागणीनुसारच समिती गठीत केली जाणार आहे. या समितीमध्ये नगरविकास, जलसंपदा, पर्यावरण आणि मदत व पुनर्वसन विभागाचे अपर सचिव, प्रधान सचिव किंवा सचिव यांचा सहभाग आहे.

तसेच नाशिक येथील 'मेरी' संस्थेचे महासंचालक संजीव टाटू, पुण्यातील नगररचना विभागाचे संचालक आणि सहसंचालक, पिंपरी चिंचवड कोल्हापूर आणि चंद्रपूर या महापालिकांचे आयुक्त महाड आणि कुळगाव बदलापूर नगर परिषदांचे मुख्याधिकारी यांचा समावेश आहे.

### दोन महिन्यात अहवाल देणार

ही समिती राज्यातील ज्या शहरांमध्ये निळ्या आणि लाल पूररेषेचा विषय अडचणीचा ठरत आहे अशा ठिकाणी नव्याने सर्वेक्षण करण्याचे व पुरामुळेL बाधित होणारे क्षेत्र आणि जीवित व मालमत्तेचे होणारे नुकसान याबाबत सरकारला उपाय सुचवणार आहेत. पूर्वाधित क्षेत्रातील बांधकामांची संख्या, बांधकामांची जोते पातळी, नदीची वहन क्षमता, प्रवाहाची दिशा व तांत्रिक मुद्द्यांचा विचार करून सरकारला ही समिती अभिप्राय देणार आहे. समितीने परिस्थिती नुसार माहिती तज्ञ,संस्था यांच्यासमवेत वेळोवेळी बैठक घ्यायची आहे तसेच आवश्यक त्या शिफारशी तयार करून अहवाल दोन महिन्यांमध्ये सरकारला मान्यतेसाठी सादर करायचा आहे.

# शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर हिंजवडीतील वाहतुकीत मोठे बदल

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**'शिवजयंती' आणि त्यानिमित्त निघणाऱ्या भव्य मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर हिंजवडी परिसरातील वाहतुकीत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. हिंजवडी गावठाण ते श्री शिवाजी महाराज चौक या मार्गावर निघणाऱ्या मिरवणुकीत हजारो नागरिक सहभागी होण्याची शक्यता असल्याने, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने काही रस्ते बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असून पर्यायी मार्ग खुले केले आहेत.**

हिंजवडी परिसरात आयटी कंपन्यांची मोठी संख्या असल्याने कामावरून घरी परतणाऱ्या नोकरदारांची गैरसोय होऊ नये, यासाठी वाहतूक पोलिसांनी हे नियोजन केले आहे. मिरवणुकीच्या काळात विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात मोठी गर्दी होणार असल्याने वाहनधारकांनी वरील पर्यायी मार्गांचा वापर करावा.



### वाहतुकीसाठी बंद असलेला मार्ग

मिरवणुकीच्या कालावधीत कस्तुरी चौक ते छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. १९ फेब्रुवारी रोजी दुपारी १५:०० ते रात्री २३:०० वाजेपर्यंत हे बदल लागू राहतील, असे पोलीस उपायुक्त (वाहतूक) विवेक पाटील यांनी अधिसूचनेद्वारे जाहीर केले आहे.

### वाहनधारकांसाठी महत्त्वाचे पर्यायी मार्ग

- कस्तुरी चौक मार्गे जाणारी वाहतूक : मारुंजी वाय जंक्शनकडून येणारी वाहने कस्तुरी चौकातून उजवीकडे वळून विनोदे वस्तीमार्गे किंवा डावीकडे वळून इंडियन ऑईल चौक मार्गे इच्छित स्थळी जाऊ शकतील.
- मेझा-९ चौकाकडून येणारी वाहतूक : ही वाहने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सरळ पुढे जाऊन इंडियन ऑईल चौक, कस्तुरी चौक आणि विनोदे वस्तीमार्गे पुढे जाऊ शकतील.
- जांभुळकर जिम चौक: शिवाजी चौकातून यु-टर्न घेऊन जाणाऱ्या वाहनांनी जांभुळकर जिम चौकातून सरळ पुढे जाऊन इंडियन ऑईल चौक आणि कस्तुरी चौक मार्गाचा अवलंब करावा.
- मेझा-९ ते शिवाजी चौक लेन : या मार्गावरील दोन लेन्सपैकी डावी लेन बंद असेल, तर सर्व वाहतूक उजव्या बाजूच्या लेनने सुरू राहील.




## भूमिका

**काँग्रेसने पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. २०१६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीपासून राज्यात काँग्रेस आणि सीपीएम यांच्यात समन्वित प्रचार पाहायला मिळायचा. दोन्ही पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते एकाच कार्यालयात बसून कार्यक्रमांचे नियोजन.**

# बंगालमध्ये काँग्रेसचा एकला चलो..!

संयुक्त रणनीती आखताना दिसायचे. मात्र, यावेळी काँग्रेसने बंगालच्या २९४ सदस्यीय विधानसभेच्या आगामी निवडणुकीत 'एकला चलो'चा नारा दिला आहे. काँग्रेसने डाव्या आघाडीबरोबरची युती तोडली आहे. २०२१ च्या निवडणुकीत या दोन्ही पक्षांना एकही जागा जिंकता आली नव्हती. आगामी निवडणुकीत काँग्रेसची रणनीती काय असेल? काँग्रेसच्या या निर्णयाचा भाजपा अन् तृणमूल काँग्रेसवर काय परिणाम होणार? जाणून घेऊयात १९७७ मध्ये डाव्या पक्षांचे पहिले सरकार आल्यापासून काँग्रेसला बंगालमध्ये स्वबळावर सत्ता मिळवता आलेली नाही. राज्यात आपला पक्ष दीर्घकाळ सत्तेबाहेर आहे, तिथे संघटना पुन्हा जिवंत करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून काँग्रेसने 'एकला चलो'चा नारा दिला आहे.



सीपीएम नेतृत्वाखालील डाव्यांशी केलेल्या युतीमुळे २०२१ ची विधानसभा निवडणूक, २०२४ ची लोकसभा निवडणूक, अशा दोन्ही निवडणुकांमध्ये काँग्रेसला पुनरागमन करण्यात यश आले नव्हते.

स्वबळावर लढण्याच्या घोषणेनंतर काही दिवसांनी काँग्रेसचे निरीक्षक सुदीप रॉय बर्मन म्हणाले, "२०२१ मध्ये आम्ही एकही जागा जिंकू शकलो नाही. यापेक्षा वाईट स्थिती असूच शकत नाही म्हणूनच आम्ही एकट्याने लढण्याचा निर्णय घेतला आहे." काँग्रेस २०२९ च्या लोकसभा निवडणुकीकडेही लक्ष ठेवून आहे. विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीत प्रमुख घटक पक्ष म्हणून 'बार्गेनिंग पॉवर' वाढवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी आणि नंतर अनेक राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये झालेल्या पराभवामुळे राष्ट्रीय स्तरावर विरोधी आघाडीचे नेतृत्व करण्याच्या काँग्रेसच्या क्षमतेवर मित्रपक्षांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

स्वबळावर लढल्यामुळे काँग्रेसला कदाचित 'तृणमूल विरुद्ध भाजपा’ हे चित्र मोडीत काढता येईल. काँग्रेस-डाव्यांच्या युतीचे स्वरूप प्रत्येक ठिकाणी नेहमीच वेगळे राहिले आहे. बंगाल, आसाम व तमिळनाडूमध्ये ते एकत्र असले तरी केरळमध्ये काँग्रेस आणि डावे पक्ष एकमेकांचे कट्टर शत्रू आहेत. योगायोगाने या चारही राज्यांमध्ये येत्या काही महिन्यांत निवडणुका होणार आहेत. २०१६ पासून प्रत्येक निवडणूक प्रचारात तृणमूल आणि भाजपा या दोन्ही पक्षांनी काँग्रेसच्या या दुटप्पी भूमिकेवर टीका केली आहे.

काँग्रेससमोर अनेक आव्हाने उभी आहेत. कमकुवत झालेली संघटनात्मक बांधणी आणि तळागाळातील मर्यादित उपस्थिती पाहता, काँग्रेसकडे सर्व २९४ जागांवर लढण्यासाठी सक्षम उमेदवार आहेत का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच, संपूर्ण निवडणूक काळात प्रचार करण्यासाठी आणि प्रत्येक बूथवर उपस्थित राहण्यासाठी लागणारी संसाधने आणि मनुष्यबळ पक्षाकडे उपलब्ध आहे का? असे प्रश्न प्रदेश काँग्रेसच्याच एका गटाने उपस्थित केले आहेत.

स्वबळावर लढल्यामुळे काँग्रेसला कदाचित 'तृणमूल विरुद्ध भाजपा’ हे चित्र मोडीत काढता येईल. काँग्रेस-डाव्यांच्या युतीचे स्वरूप प्रत्येक ठिकाणी नेहमीच वेगळे राहिले आहे. बंगाल, आसाम व तमिळनाडूमध्ये ते एकत्र असले तरी केरळमध्ये काँग्रेस आणि डावे पक्ष एकमेकांचे कट्टर शत्रू आहेत. योगायोगाने या चारही राज्यांमध्ये येत्या काही महिन्यांत निवडणुका होणार आहेत.

## प्रासंगिक »

### हुशार शेतकरी

***एका गावात एक शेतकरी राहत होता. त्याला प्राणी पाळण्याची खूप आवड होती. त्याच्याकडे शेळी, मेंढी, वाघ, गाय असे अनेक प्राणी होते. तो रोज त्यांना शेतात चारायला नेत असे. वाघ शेळीला खाईल या भीतीने तो दोघांना नेहमी सोबत ठेवत असे.***

एके दिवशी शेतात जाताना त्याला नदी पार करावी लागली. मध्येच पाऊस सुरू झाला आणि नदीला पूर आला. घरी येताना शेतकरी शेळी, वाघ आणि गवताची पेंडी घेऊन नदीकिनारी आला. पण नावेत एकावेळी फक्त दोनच जण जाऊ शकत होते.जर तो गवत आधी नेला तर वाघ शेळीला खाईल; वाघ नेला तर शेळी गवत खाईल — अशी अडचण निर्माण झाली. शेतकऱ्याने उपाय काढला. तो आधी शेळीला घेऊन गेला आणि तिला तिकडे सोडले. मग परत येऊन वाघाला नेले; पण तिकडे शेळी एकटी राहू नये म्हणून शेळीला परत आणले. नंतर गवत नेले आणि शेवटी पुन्हा येऊन शेळीला घेऊन गेला. अशा हुशारीने शेतकऱ्याने सर्वांना सुरक्षितपणे नदी पार नेले. गवत खाऊन टाकेल.

-तात्पर्य: विचार करून काम केले तर कोणतीच गोष्ट अशक्य नाही.

राजकारणात काय बोलायचे याइतकेच कधी आणि कुठे बोलू नये याचे भान असणे तितकेच आवश्यक असते. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अलीकडे टिपू सुलतान यांच्याबाबत केलेले विधान हे याचेच उदाहरण ठरले.

# हर्षवर्धन सपकाळांचा राजकीय 'सेल्फ गोल'

टिपू सुलतान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना करणे हा केवळ ऐतिहासिकदृष्ट्या वादग्रस्त मुद्दा नाही, तर राजकीयदृष्ट्याही काँग्रेससाठी घातक ठरलेला 'सेल्फ गोल' आहे.

टिपू सुलतान यांचे व्यक्तिमत्त्व इतिहासात मतभेद निर्माण करणारे राहिले आहे. काही जण त्यांना इंग्रजांविरोधातील पराक्रमी योद्धा मानतात, तर इतरांच्या दृष्टीने ते धार्मिक असहिष्णुतेचे प्रतीक आहेत. अशा व्यक्तीची तुलना शिवाजी महाराजांसारख्या सर्वमान्य आणि लोकप्रेरणास्थान असलेल्या नेत्याशी करणे म्हणजे अनावश्यक वाद ओढवून घेणे होय. त्यामुळे या विधानाकडे राजकीय अपरिपक्वतेच्या दृष्टीने पाहिले जात आहे.

सपकाळ यांनी स्पष्टवक्तेपणाचा मार्ग स्वीकारला असला, तरी राजकारणात प्रत्येक प्रश्नाला थेट उत्तर देणे शहाणपणाचे नसते. अनेक अनुभवी नेते प्रसंगी प्रश्न टाळतात





किंवा चर्चेचा विषय बदलतात. मात्र या प्रकरणात विरोधकांच्या हातात आयते शस्त्र देण्यात आले. परिणामी भारतीय जनता पार्टी ला काँग्रेसवर धर्म आणि इतिहासाच्या मुद्द्यावर आक्रमण करण्याची संधी मिळाली.

काँग्रेसच्या प्रवक्त्यांनी भाजपच्या कारकिर्दीत टिपू सुलतान यांच्या नावाने करण्यात आलेल्या नामकरणांचा उल्लेख केला, तो तथ्याधारित असू शकतो. पण राजकारणात केवळ तथ्ये नव्हे, तर भावना अधिक प्रभावी ठरतात. त्यामुळे प्रारंभीचे विधानच वादाचे मूळ ठरले, हे नाकारता येत नाही.

यावेळी राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन जवळ आले आहे. शेतकरी प्रश्न, महागाई, बेरोजगारी आणि औद्योगिक अडचणी यांसारखे ज्वलंत विषय प्राधान्याने मांडण्याऐवजी काँग्रेस स्वतःच बचावात्मक भूमिकेत अडकली आहे. आता अधिवेशनात भाजपकडून याच मुद्द्यावरून काँग्रेसला घेरले जाण्याची शक्यता आहे.विरोधी पक्षाचे कर्तव्य सरकारला लोकांच्या प्रश्नांवर उत्तर देण्यास भाग पाडणे हे असते. परंतु जर विरोधकच भावनिक वादांना खतपाणी घालत असतील, तर त्यांची भूमिका कमकुवत होते. या प्रकरणातून काँग्रेसने धडा घ्यायला हवा—वादग्रस्त ऐतिहासिक मुद्द्यांपेक्षा जनतेच्या दैनंदिन समस्यांवर ठाम आणि सातत्यपूर्ण भूमिका घेणे, हेच प्रभावी विरोधी राजकारणाचे खरे सूत्र आहे.

## ।। अभंगवाणी ।।



राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशिकळा लोपलिया ॥१॥

कस्तुरीमळवट चंदनाची उटी ।
रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# होळीनिमित्त कोकणसाठी 'लालपरी' सज्ज

## होळीच्या काळात प्रवाशांचा प्रवास सुरक्षित, वेगवान, स्वस्त व्हावा यासाठी नियोजन

**महाईन्यूज । मुंबई**

**'गाव तेथे एसटी' या ब्रीद वाक्यानुसार महानगर आणि खेडेगावांना 'लालपरी'ची सेवा जोडलेली आहे. होळीच्या काळात प्रवाशांचा प्रवास सुरक्षित, वेगवान, स्वस्त व्हावा यासाठी एसटी महामंडळाने वाढीव फेऱ्या सोडण्याचे नियोजन केले आहे. प्रवाशांच्या वाढत्या गर्दीचा अचूक अंदाज घेऊन एसटी महामंडळाने 'होळी जादा ऑपरेशन २०२६'अंतर्गत मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड या विभागांतून तब्बल १९८ जादा फेऱ्या चालवण्याची घोषणा केली आहे.**




'लालपरी' २७ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत कोकणाच्या दिशेने अधिक वेगाने धावणार असून, होळीनिमित्त हजारो प्रवाशांचा प्रवास सुरक्षित, सुलभ व्हावा यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. या विशेष मोहिमेत सर्वाधिक फेऱ्यांचे नियोजन ठाणे आणि मुंबई विभागांतून करण्यात आले आहे. ठाणे विभागातून तब्बल ७९ फेऱ्या नियोजित असून, त्यापैकी ७१ फेऱ्या आगाऊ आरक्षणामुळे आधीच पूर्ण क्षमतेने सज्ज झाल्या आहेत. मुंबई विभागातून ६२ फेऱ्या नियोजित असून, ३७ फेऱ्यांचे आरक्षण झाले आहे. तर २५ फेऱ्या गट आरक्षणासाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पालघर विभागातून २४ फेऱ्या पूर्णपणे गट आरक्षणाच्या माध्यमातून चालवण्यात येणार आहेत. रायगड विभागातून ३३ फेऱ्या होणार असून, त्या सर्व आरक्षित प्रवाशांसाठी उपलब्ध आहेत.

### 'लालपरी'ची सर्वाधिक धाव

या विशेष मोहिमेतील सर्वाधिक गर्दी २८ फेब्रुवारी आणि १ मार्च या दोन दिवशी अपेक्षित आहे. २८ फेब्रुवारी रोजी तब्बल ९१ फेऱ्या, तर १ मार्च रोजी ५९ फेऱ्या नियोजित केल्या आहेत. होळीच्या पूर्वसंध्येला गावी जाणाऱ्यांची संख्या अधिक असल्याने एसटी प्रशासनाने या दिवसांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

### 'लालपरी' ठरणार विश्वासू

एसटी महामंडळाच्या या नियोजनामुळे होळीच्या सणात होणारी संभाव्य गैरसोय टळणार असून, प्रवाशांना सुरक्षित आणि किफायतशीर प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. याचबरोबर खासगी वाहतुकदारांकडून होणाऱ्या मनमानी भाडेवाढीलाही आळा बसेल. होळीनिमित्त नातेवाईकांच्या भेटीसाठी जाणाऱ्या प्रवाशांकरीता 'लालपरी' सज्ज झाली आहे, अशी भावना एसटी महामंडळाने व्यक्त केली.

### गट आरक्षणाला प्राधान्य

एकूण १९८ फेऱ्यांपैकी १४१ फेऱ्या नियमित आरक्षणासाठी, तर ५७ फेऱ्या गट आरक्षणासाठी राखीव आहेत. यामुळे कुटुंब, मित्र मंडळी किंवा संस्थात्मक प्रवास करणाऱ्या प्रवाशांनाही पर्याय उपलब्ध झाला आहे.

# कुडाळला धुंदीबाबा महाराजांचा रथोत्सव उत्साहात साजरा

**महाईन्यूज । कुडाळ**

**जावळी तालुक्यासह संपुर्ण महाराष्ट्रात हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले सदगुरू 1008 महंत श्री देवीपुरी महाराज तथा धुंदीबाबा महाराज यांचा रथोत्सव आज हजारो भाविकांच्या उपस्थित मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री देवीपुरी महाराज तथा धुंदीबाबा महाराज दरवर्षी महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे दर्श अमवस्येला आपल्या जन्मगावी बेलावडे ता. जावळी येथे आपल्या भक्तगणांना दर्शन देण्यासाठी येत असत.गेल्या बेचाळीस वर्षांपासून धुंदीबाबांच्या निर्वाणानंतरही त्यांच्या रथयात्रेची परंपरा अंखडीत सूरू असून धुंदीबाबांचे शिष्य श्री योगीपुरी महाराज या रथयात्रेत सहभागी होऊन येथील भक्तगणांना आशिर्वाद देत असतात.**






### धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचेही आयोजन

आजही तेवढ्याच भक्तीभावाने बेलावडे, सोनगाव व आर्डे येथील त्यांचे भक्तगण व ग्रामस्थ श्री योगीपुरी महाराजांच्या रूपात धुंदीबाबा आल्याचे समाधान मानून रथयात्रा मोठ्या उत्साहात पार पाडतात. कुडाळ ता. जावळी येथून सूरू होत असलेली रथयात्रा गुलालाच्या उधळणीत व ढोल ताशांच्या गजरात ओम धुंदी तत सत च्या जयघोषात सोनगाव मार्गे बेलावडे येथील मेरूलिंगदरा अशी शांततेत व उत्साहात पार पडली. कुडाळ येथील महाराजा शिवाजी हायस्कूल व सोनगाव येथील धुंदीबाबा विद्यालयातील विध्यार्थ्यांना महाराजांच्या हस्ते शालेय साहीत्य व खाउवाटप करण्यात आले त्यानंतर मेरूलिंगदरा येथे रथयात्रेची सांगता ही भंडारा, महाप्रसाद तसेच विविध धार्मिक कार्यक्रमानंतर करण्यात आली यावेळी तालुक्यातील विविध पक्षांचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# भारत आणि फ्रान्समध्ये विशेष धोरणात्मक भागीदारी

## साहिल गोयल यांचा विश्वास: तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे व्यवसायातील अडचणी कमी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन तीन दिवसीय भारत भेटीवर आले असून आज ते मुंबईत आहेत. त्यानिमित्ताने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीही आज मुंबईत आले. या दोन्ही वरिष्ठ नेत्यांमध्ये द्विपक्षीय बैठक झाली. या बैठकीत दोन्ही देशातील व्यापारवृद्धीवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माध्यमांना संबोधित केले. यावेळी त्यांनी भारत आणि फ्रान्स यांच्यातील 'विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी'ची घोषणा केली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत-फ्रान्सच्या द्विपक्षीय संबंधात संरक्षण, स्वच्छ ऊर्जा, अवकाश आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील सहकार्यावर भर दिला जाईल. त्यांनी नमूद केले की हा उपक्रम उद्योग, स्टार्टअप आणि एमएसएमई यांना जोडेल. विद्यार्थी आणि संशोधकांमधील देवाणघेवाणीला प्रोत्साहन देईल आणि फ्रान्ससोबत संयुक्त करारासाठी नवीन केंद्रे स्थापन करेल. भारत-फ्रान्स नवोन्मेष वर्ष २०२६ निमित्त मॅक्रॉन यांचा हा चौथा भारत दौरा आहे आणि मुंबईला त्यांचा पहिलाच दौरा आहे. हा दौरा दोन्ही राष्ट्रांमधील वाढत्या धोरणात्मक आणि तांत्रिक भागीदारी मजबूत करेल. मॅक्रॉन यांनी इंडो-पॅसिफिकमधील सहकार्य, तंत्रज्ञान आणि नियम-आधारित व्यवस्थेवर प्रकाश टाकला आणि आयएमईसी कॉरिडॉर, कृत्रिम बुद्धिमत्ता सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय सौर आघाडी यासारख्या संयुक्त उपक्रमांचा उल्लेख केला, असे नमूद करून की गेल्या आठ वर्षांत दोन्ही देशांनी एकत्रितपणे नवीन मार्ग शोधले आहेत.



### इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी मानले आभार

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आणि द्विपक्षीय संबंधांना "उल्लेखनीय आणि अद्वितीय" असं वर्णन केलं. ते म्हणाले की दोन्ही राष्ट्रांनी त्यांचे संबंध विश्वास, मोकळेपणा आणि महत्त्वाकांक्षेवर आधारित विशेष धोरणात्मक भागीदारीकडे नेण्याचा निर्णय घेतला आहे.

### हेलिकॉप्टरची निर्मिती करू

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, "भारत आणि फ्रान्स भारतात माउंट एव्हरेस्टच्या उंचीवर उडण्यास सक्षम असलेले जगातील एकमेव हेलिकॉप्टर तयार करतील आणि ते जागतिक स्तरावर निर्यात केले जातील. भारत-फ्रान्स भागीदारीला कोणत्याही सीमा नाहीत. या दोन्ही देशातील भागीदारी खोल महासागरांपासून सर्वात उंच पर्वतांपर्यंत पसरलेली असेल. जग अनिश्चिततेच्या काळातून जात असताना, भारत-फ्रान्स भागीदारी जागतिक स्थिरतेसाठी एक शक्ती बनेल, असे ते म्हणाले.

# यूएईने पैसे मागताच पाकिस्तानने गुडघे टेकले

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर अचानक संयुक्त अरब अमिरातीच्या (यूएई) दौऱ्यावर पोहोचले आहेत. सौदी अरेबियासोबत पाकिस्तानने केलेल्या संरक्षण करारामुळे यूएई नाराज असल्याची चर्चा होत असतानाच हा दौरा होत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सौदी आणि यूएईमधील प्रादेशिक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर यूएईने पाकिस्तानकडे थकीत कर्जाची परतफेड करण्याची मागणी केली आहे. या बिघडलेल्या संबंधांना सुधारण्यासाठी मुनीर यांचा हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. या भेटीदरम्यान जनरल मुनीर यांनी यूएई सरकारने गेल्या अनेक दशकांपासून पाकिस्तानच्या अर्थव्यवस्था आणि सुरक्षेला दिलेल्या खंबीर पाठिंब्याबद्दल आभार मानले**

अबू धाबी येथे जनरल मुनीर यांनी यूएईचे उपशासक आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार शेख तहनून बिन झायेद अल नाहयान यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी संयुक्त अरब अमिरातीची सुरक्षा आणि स्थिरता ही पाकिस्तानच्या सुरक्षेचा अविभाज्य भाग असल्याचे प्रतिपादन केले.



### पाकिस्तान-यूएई संबंधांतील तणाव वाढला?

गेल्या काही वर्षांपासून उभय देशांमधील संबंधांमध्ये काहीसा दुरावा निर्माण झाला आहे. हा तणाव निवळण्यासाठी आठवड्याभरापूर्वी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी यूएईचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद झायेद बिन अल नाहयान यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली होती. मात्र, त्यातून ठोस तोडगा न निघाल्याने आता लष्करप्रमुख असीम मुनीर स्वतः अबू धाबीमध्ये पोहोचले आहेत. विशेष म्हणजे गेल्या महिन्यातच मुनीर यांनी सौदी अरेबियाचाही दौरा केला होता. सौदीशी वाढती जवळीक आणि संरक्षण करारामुळे यूएई नाराज असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

### पाकिस्तानी लष्कराची अधिकृत भूमिका

पाकिस्तानी लष्कराची प्रसिद्धी शाखा इंटर सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्सने दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीत दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्यावर चर्चा केली. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक सहयोग, गुंतवणूक आणि सुरक्षा क्षेत्रातील समन्वयावर भर देण्यात आला. याशिवाय प्रादेशिक घडामोडींवर विचारांचे आदान-प्रदान करण्यात आले असून शांतता व स्थिरतेसाठी दोन्ही देशांनी निरंतर संपर्कात राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

### सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त

या भेटीदरम्यान जनरल मुनीर यांनी यूएई सरकारने गेल्या अनेक दशकांपासून पाकिस्तानच्या अर्थव्यवस्था आणि सुरक्षेला दिलेल्या खंबीर पाठिंब्याबद्दल आभार मानले. यूएईचा पाठिंबा दोन्ही देशांमधील ऐतिहासिक आणि बंधुभावाच्या संबंधांचे प्रतीक आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सौदी आणि यूएईमधील प्रादेशिक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर यूएईने पाकिस्तानकडे थकीत कर्जाची परतफेड करण्याची मागणी केली आहे. पाकिस्तानच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात यूएईच्या नेतृत्वाची भूमिका अत्यंत विधायक राहिली आहे, असे मुनीर यांनी यावेळी नमूद केले.

## 'चरक' महोत्सवात अंजली

दकेरळ स्टारी' चित्रपटाचे राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक सुदीप्तो सेनसिनेनिर्मितीकडे वळले असून, त्यांनी 'चरक' या आगामी चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटात मराठमोळी अभिनेत्री अंजली पाटील मुख्य भूमिकेत दिसणार आहे. तिच्या जोडीला साहिदूर रहमान, सुब्रत दत्ता, शशी भूषण, नलीश नील, संकल्पदीप, शौनक श्यामल आदी कलाकार आहेत. चरक हा शिव शंकर आणि कालीमातेचा एकत्रित उत्सव आहे. भक्तांसाठी मनोकामना पूर्ण करण्याची शेवटची संधी, असा प्रदर्शित झालेल्या 'चरक'च्या टिझरमध्ये संवाद आहेत. 'चरक' मध्ये मृतदेहांची भेट का चढवली जाते? हा अंजलीने टिझरमध्ये विचारलेला प्रश्न चित्रपटाबाबतची उत्सुकता वाढविणारा असून, बरेच प्रश्नही उपस्थित करणारा आहे. शिलादीत्य मौलिक यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे.



## अनन्या पांडे पुन्हा प्रेमात !

बॉलीवूड अभिनेत्री अनन्या पांडे आपल्या चित्रपटांशिवाय वैयक्तिक आयुष्यामुळेही नेहमीच चर्चेत असते. विशेषतः अनन्याच्या रिलेशनशिपबद्दल अनेक चर्चा होत असतात. यातच आता अनन्याने व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी तिच्या प्रेमाची कबूली दिल्याचे म्हंटले जात आहे. अनन्या पांडे एका विदेशी मॉडेलला डेट करत असल्याची चर्चा आहे. तिने सोशल मिडियावर एक पोस्ट शेअर केल्याने या चर्चांना उधाण आले आहे. तिने इन्स्टाग्राम अकाउंटवरून व्हॅलेंटाईन डे निमित्त एक स्टोरी शेअर केली. त्यात तिने मॉडेल वॉकर ब्लॅन्कोचा फोटो शेअर करत त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. वॉकरच्या बर्थडे निमित्तानं तिनं ही पोस्ट लिहिली आहे. या फोटोमध्ये वॉकर घराच्या बाल्कनीत बसलेले आणि फोनवर बोलताना कॅमेऱ्याकडे पाहून पोझ देताना दिसत आहेत. फोटोसोबत अनन्याने कॅप्शनमध्ये लिहिले, "हॅप्पी बर्थडे वॉकर ब्लॅन्को, तू सर्वात बेस्ट आहेस." अनन्याच्या या पोस्टमुळे तिने आपले रिलेशनशिप अधिकृतपणे जाहीर केल्याची चर्चा रंगू लागली आहे. यापूर्वी अनन्याच्या अनन्याच्या बर्थडेला वॉकरने तिच्यासाठी पोस्ट लिहिली होती. त्याने लिहिलेलं, "हॅप्पी बर्थडे ब्युटिफुल. आय लव्ह यू अँनी." शिकागो-मियामीचा रहिवासी वॉकर अनेक वर्ष मॉडेलिंग करत होता. नोव्हेंबर 2025 मध्ये अनंत अंबानीच्या लग्नातही अनन्या आणि वॉकर यांना एकत्र पाहिलं गेलं होतं. याआधी अनन्या पांडे तिच्यापेक्षा मोठा असलेल्या आदित्य रॉय कपूरसोबत रिलेशनमध्ये होती. मात्र 2024 मध्ये दोघांचं ब्रेकअप झालं. त्यानंतर अनन्याचं नाव वॉकरशी जोडलं जात आहे. अनन्याच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झाल्यास तिचे 'कॉल मी बेब' आणि 'खो गये हम कहां' सारखे चित्रपट हिट ठरले. ती अलीकडेच कार्तिक आर्यनसोबत 'तू मेरी मैं तोरा मैं तेरा तू मेरी' या चित्रपटात दिसली. मात्र हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर विशेष यश मिळवू शकला नाही. आता लवकरच ती धर्मा प्रोडक्शन्सच्या रोमँटिक कॉमेडी 'चांद मेरा दिल' या चित्रपटात झळकणार आहेत. हा चित्रपट ८ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.



## धुरंधर फेम अभिनेत्रीचा खास संदेश !

धुरंधर चित्रपटाने मोठा इतिहास रचला. या चित्रपटाने २०२५ या वर्षात रिलीज झालेल्या सर्वच चित्रपटांचे रेकॉर्ड मोडले. चित्रपटात रेहमान डेकैतच्या भूमिकेत अक्षय खन्नाच्या अभिनयाने प्रेक्षकांना भुरळ घातली. यासोबत इतरही कलाकारांच्या अभिनयाचे कौतुक करण्यात आले. या चित्रपटात अभिनेत्री सारा अर्जुनच्या अभिनयाचे प्रेक्षकांनी खूप कौतुक केले. अशातच अभिनेत्री सारा अर्जुनने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून एक महत्त्वाचा संदेश चाहत्यांसाठी जारी केला आहे, ज्यामध्ये तिने चाहत्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. धुरंधरमुळे सारा अर्जुनला मोठी लोकप्रियता मिळाली. अभिनेत्रीने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर तिच्या सर्व चाहत्यांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. "तुम्हा सर्वांना सुप्रभात आणि सर्वांना महाशुवरात्रीच्या शुभेच्छा." असे तिने पोस्टमध्ये म्हटले आहे. तसेच या पोस्टमध्ये साराने एक महत्वाचा संदेश चाहत्यांना दिला आहे. सारा अर्जुनने इंस्टाग्राम स्टोरीवर ती ट्विटरवर सक्रिय नसल्याचे स्पष्ट केले आहे. "मला फक्त काही महत्त्वाची माहिती शेअर करायची होती. मी ट्विटरवर नाही." असे ती म्हणाली आहे. जर तुम्हाला माझ्या नावाने कोणत्याही हँडलवरून कोणतेही ट्विट किंवा विधान दिसले तर कृपया समजून घ्या की ते मी केलेले नाही.



## शर्वरीचा चौकार!

मराठमोळी अभिनेत्री शर्वरीने पदार्पणपासूनच रसिकांचे लक्ष वेधले आहे. 'महाराज' आणि 'मुंज्या' चित्रपटांमधील तिच्या कामाचे खूप कौतुक झाले. त्यामुळेच तिला यशराज फिल्म्सचा ॲक्शन थ्रिलर 'अल्फा' मिळाला. शिव रवैल दिग्दर्शित या चित्रपटात ती आलिया भट्टसोबत दिसणार असल्याचे सर्वश्रुत आहे. या चित्रपटाच्या पोस्ट प्रोडक्शनचे काम सुरू आहे. याखेरीज शर्वरी आणखी तीन चित्रपटांमध्ये झळकणार आहे. यात दिग्दर्शक इम्तियाज अलींच्या महत्त्वपूर्ण चित्रपटाचा समावेश आहे. याशिवाय सूरज बडजात्यांच्या 'ये प्रेम मोल लिया'मध्ये तिच्यासोबत आयुष्मान खुराणा आहे. पुढल्या वर्षी प्रदर्शनाची योजना असलेल्या या दोन्ही चित्रपटांचे चित्रीकरण सुरू आहे. सध्या प्री-प्रोडक्शनमध्ये असलेला आदित्य सरपोतदार दिग्दर्शित 'महा मुंज्या' मध्ये ती बेला बनली असून, हा चित्रपट २०२७मध्ये प्रदर्शित होईल.



# पावसाचा अनपेक्षित फायदा; ऑस्ट्रेलियाचं स्वप्न भंगलं

## सामना रद्द, समीकरण बदललं; झिम्बाब्वेचा ऐतिहासिक प्रवेश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील ३२ वा सामना झिम्बाब्वे आणि आयर्लंड या दोन्ही संघांमध्ये होणार होता. पण २ तास वाट पाहूनही पाऊस न थांबल्याने हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी १-१ गुण देण्यात आला आहे. या एका गुणासह झिम्बाब्वेने सुपर ८ फेरीत प्रवेश केला आहे. तर ऑस्ट्रेलियाचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.**




### झिम्बाब्वेचा सुपर-८ मध्ये प्रवेश

तर झिम्बाब्वे संघासाठी हा ऐतिहासिक क्षण आहे. कारण झिम्बाब्वेने पहिल्यांदाच टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील सुपर ८ मध्ये प्रवेश केला आहे. झिम्बाब्वेने या स्पर्धेतील ३ पैकी २ सामने जिंकले आहेत. तर १ सामना पावसामुळे रद्द झाला आहे. त्यामुळे झिम्बाब्वेचा संघ ५ गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. श्रीलंकेने जर पुढील सामना गमावला, तर झिम्बाब्वेचा संघ ७ गुणांसह पहिल्या स्थानी पोहोचू शकतो.

झिम्बाब्वे आणि आयर्लंड यांच्यात होणारा सामना हा ऑस्ट्रेलियासाठी अतिशय महत्वाचा होता. कारण स्पर्धेतून बाहेर होण्याच्या उंबरठ्यावर असणाऱ्या ऑस्ट्रेलियाला ओमानविरूद्ध विजय मिळवूनही झिम्बाब्वेच्या दोन्ही सामन्यातील पराभवाची वाट पाहायची होती. पण झिम्बाब्वेचा संघ सामन्याचा निकाल न येताच आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील सुपर ८ फेरीत प्रवेश करणारा सातवा संघ ठरला आहे.

आयसीसीच्या स्पर्धांमध्ये ऑस्ट्रेलियाचा नेहमीच दबदबा पाहायला मिळत असतो. पण यावेळी असं काही घडलेलं नाही. खेळाडूंनी नावाला साजेशी कामगिरी न करणं आणि प्रमुख खेळाडू दुखापतीमुळे संघाबाहेर होणं, हे ऑस्ट्रेलियाच्या अपयशाचं प्रमुख कारण आहे. पण टी-२० फॉरमॅटमध्ये अनुभवापेक्षा, मिळालेल्या संधीचं सोनं कोण करतं, हे महत्वाचं ठरतं. जो संघ १२० चेंडूंमध्ये चांगली कामगिरी करतो, तो विजयाचा मानकरी ठरतो. पण ऑस्ट्रेलियाकडून तसा खेळ पाहायला मिळाला नाही. ऑस्ट्रेलियाने आयर्लंडला तर हरवलं, पण झिम्बाब्वे आणि श्रीलंकेविरूद्ध झालेल्या सामन्यात एकतर्फी पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळेच ऑस्ट्रेलियाला सुपर ८ मध्ये प्रवेश करण्यासाठी झिम्बाब्वेवर अवलंबून राहावं लागलं. पण पाऊस झिम्बाब्वेच्या मदतीला धावून आला आणि या सामन्यातील एकही चेंडू न खेळता झिम्बाब्वेचा संघ सुपर ८ फेरीत दाखल झाला.

# युवराज सामराचं ऐतिहासिक शतक; वर्ल्डकपमध्ये विश्वविक्रम

**महाईन्यूज । मुंबई**

**टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये आज १७ फेब्रुवारीला कॅनडा आणि न्यूझीलंड यांच्यात सामना खेळवला जात आहे. या सामन्यात कॅनडाने कमालीची फलंदाजी केली. कॅनडाचा सलामीवीर फलंदाज असलेल्या युवराज सामराने न्यूझीलंडविरूद्ध सामन्यात शतक झळकावलं आहे. १९ वर्षीय या भारतीय वंशाच्या फलंदाजाने किवी गोलंदाजांची धुलाई करत संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. या शतकी खेळीसह त्याने वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला आहे.**




युवराज सामराने फक्त ५८ चेंडूत शतक झळकावलं. तर अखेरच्या षटकात मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो झेलबाद झाला. युवराज सामराने या सामन्यात ६५ चेंडूत ११ चौकार व ६ षटकारांसह १६८.३३ च्या स्ट्राईक रेटसह ११० धावांची उत्कृष्ट खेळी केली. याह कॅनडाने न्यूझीलंडविरूद्ध २० षटकांत ४ बाद १७३ धावा उभारल्या आहेत.युवराज सामरा हा टी-२० विश्वचषक इतिहासात शतक करणारा सर्वात तरूण फलंदाज ठरला आहे. युवराज सामरा हा फक्त १९ वर्षांचा आहे आणि अवघ्या १९व्या वर्षी शतक करत विश्वविक्रमाची नोंददेखील आपल्या नावे केली आहे. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात २० वर्षांखालील फलंदाजाने शतक ठोकण्याचा पराक्रम करण्याची ही पहिलीच वेळ आहे.युवराज सामरा हा केवळ टी-२० विश्वचषकातच नव्हे तर आयसीसी स्पर्धांमध्येही शतक करणारा सर्वात तरुण फलंदाज ठरला आहे. त्याने आयर्लंडचा स्टार फलंदाज पॉल स्टर्लिंगचा विक्रम मोडत ही कामगिरी केली. युवराज सामराने पाकिस्तानच्या अहमद शहजादचा विश्वविक्रम मोडला, ज्याने २०१४ च्या टी-२० विश्वचषकात बांगलादेशविरुद्ध २२ वर्षे आणि १२७ दिवस वय असताना शतक झळकावलं होतं. आता युवराज समराने अवघ्या १९ वर्षे १४१ दिवस वयाचा असताना शतक झळकावलं. सामरा फक्त १९ वर्षांचा आहे, पण त्याने कॅनडासाठी ८ एकदिवसीय आणि १६ टी-२० सामने खेळले आहेत आणि त्याच्या सर्वोत्तम कामगिरीपैकी एक म्हणजे गेल्या वर्षी बहामासविरुद्ध त्याने फक्त १५ चेंडूत अर्धशतक झळकावलं होतं, हा एक राष्ट्रीय विक्रम आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।
दि. 18 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# नागेश्वर महाराजांच्या मानाच्या विड्यास २५ लाख!

## मोशीतील श्री नागेश्वर महाराज यात्रा उत्सव उत्साहात संपन्न

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**मोशी येथील जागृत देवस्थान नागेश्वर महाराज मंदिर येथे सुरू असलेल्या नागेश्वर महाराज यात्रा व भंडारा उत्सवानिमित्त पारंपरिक लिलाव सोहळा मंगळवारी भक्तिभावाच्या वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी श्री नागेश्वर महाराजांच्या मानाच्या विड्यास तब्बल २५ लाख रुपयांची बोली लागली. अकरा लाखांपासून सुरू झालेली बोली बारा, पंधरा, अठरा लाख असा टप्पा पार करत अखेर पंचवीस लाखांवर जाऊन थांबली. तिसरा व अंतिम पुकारा होताच मंदिर परिसरात टाळ्यांचा गजर झाला. मानाचा विडा मिळविणारे भाविक विजय पांडुरंग सस्ते यांनी नागेश्वर महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन आपली श्रद्धा व्यक्त केली.**





महाशिवरात्रीपासून सुरू झालेल्या या वार्षिक उत्सवात मंगळवारी सकाळी अकरा वाजता नागेश्वर महाराज मंदिर सभागृहात परंपरेनुसार लिलावास सुरुवात झाली. उत्सवकाळात महाराजांच्या चरणी अर्पण करण्यात आलेल्या वस्तू, भंडाऱ्यातील प्रसाद व अन्य धार्मिक साहित्याचा लिलाव मोठ्या श्रद्धेने करण्यात आला. यंदा एकूण लिलावाची रक्कम जवळपास पन्नास लाख रुपयांच्या पुढे गेली असून, यावरून मोशीकरांची नागेश्वर महाराजांवरील अतूट श्रद्धा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

मानाची ओटी आकाश विष्णू सस्ते यांनी १५ लाख ११ हजार १०१ रुपये इतक्या मोठ्या रकमेची बोली लावून मिळवली. तर मानाचे शेवटचे फळ स्वप्नील सासवडे यांनी १ लाख १ हजार ५ रुपये देऊन घेतले. मानाचा पहिला लिलाव योगेश गुलाब बोराटे यांनी २ लाख ५१ हजार रुपये इतक्या बोलीत जिंकला. यावर्षी लिलाव करण्याचा मान केदारी कुटुंबाला देण्यात आला होता. त्यांनी लिलावाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली.



दरवर्षीप्रमाणे यंदाही या लिलावासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. “देवाच्या दारात पैशाला मोल नसते” याचा प्रत्यय देणारा हा सोहळा सुरुवातीपासून शेवटपर्यंत भक्तिरसाने भारलेला होता. लिलावामध्ये सोन्या-चांदीच्या वस्तू, भंडाऱ्यातील प्रसाद तसेच उत्सवासाठी वापरण्यात आलेल्या विविध वस्तूंचा समावेश होता. परंपरेनुसार ग्रामस्थांच्या वतीने भंडाऱ्याचा महाप्रसाद बनविण्यासाठी लागणारी भांडी दरवर्षी नव्याने खरेदी केली जातात.

मोशीकरांच्या श्रद्धा, परंपरा आणि भक्तीचा संगम असलेला नागेश्वर महाराज यात्रा व लिलाव उत्सव यंदाही जल्लोषात पार पडला. धार्मिक विधी, भक्तिभाव आणि लाखोंच्या बोलीतून व्यक्त होणारी श्रद्धा यामुळे हा उत्सव भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला.

# पी.डब्ल्यू.डी. मैदानावर २५ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान ‘पवनाथडी जत्रा’

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या समाज विकास विभागामार्फत दि. २५ फेब्रुवारी २०२६ ते १ मार्च २०२६ या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी. मैदानावर ‘पवनाथडी जत्रा’चे आयोजन करण्यात आले आहे. महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्यांचा विकास करणे तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरा आणि शहरी संस्कृतीचे जतन करणे हा या जत्रेचा मुख्य उद्देश आहे.**




“ पवना थडी जत्रेमध्ये महिला बचत गटांना मोठे आपल्या वस्तू व पदार्थ विक्रीसाठी मोठे व्यासपीठ मिळणार आहे. याद्वारे जास्तीत जास्त महिला बचत गटांना या जत्रेत आपल्या उत्पादनांसाठी मोठी बाजारपेठ मिळणार आहे.

-रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### आवश्यक कागदपत्रे

- बचत गटाचे नोंदणी प्रमाणपत्र
- संबंधित महिलेचे आधार कार्ड
- बँक पासबुकची प्रत
- फोटो

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील जत्रेसाठी सहभाग अर्जांचे वाटप व स्वीकृती दि. १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे. सदर अर्ज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाकडे सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत उपलब्ध आहेत. या जत्रेकरिता जनरल, व्हेज आणि नॉन व्हेज या तीन प्रकारात स्टॉल वाटप करण्यात येणार आहेत.

# पिंपळे गुरवमध्ये गोदामांना भीषण आग

## विश्वकर्मा मंदिराजवळील चार गोडाऊनला आग; ५ अग्निशमन पथकांची धाव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे गुरव येथील भाऊ नगर परिसरातील विश्वकर्मा मंदिराजवळ काल चार गोडाऊनला अचानक आग लागल्याची घटना घडली. ही आग पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या पथकाने तात्काळ नियंत्रणात आणली. या घटनेत एक फर्निचर दुकान पूर्णतः जळून खाक झाले असून लाखों रूपयांचे नुकसान झाले आहे.**



घटनेची माहिती मिळताच मुख्य अग्निशमन केंद्र, भोसरी उप अग्निशमन केंद्र , तळवडे उप अग्निशमन केंद्र, चोवीसावाडी उप अग्निशमन केंद्र आणि रहाटणी उप अग्निशमन केंद्र येथील पाच पथके गाड्यांसह घटनास्थळी दाखल झाली.

भाऊ नगर परिसरातील चिंचोळ्या बोळींमुळे अग्निशमन वाहनांना घटनास्थळी पोहोचण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या. मात्र, अग्निशमन विभागाच्या जवानांनी अवघ्या वीस मिनिटांत आग नियंत्रणात आणली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून, मोठी दुर्घटना टळली आहे. अग्निशमन विभागाच्या तत्पर आणि समन्वयपूर्ण कार्यामुळे आग इतरत्र पसरण्यापासून रोखण्यात यश आले. दरम्यान, अशा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन विभागाच्या १०१ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क करा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अग्निशमन दलाची तत्पर कारवाई

भाऊ नगर येथील चार गोडाऊनला लागलेली आग पाच अग्निशमन पथकांनी अवघ्या २० मिनिटांत नियंत्रणात आणली. एक फर्निचर दुकान जळून लाखोंचे नुकसान झाले, मात्र कोणतीही जीवितहानी झाली नाही. आपत्कालीन प्रसंगी १०१ वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले.

# आजची जागरूकता उद्याचा सशक्त समाज घडवते : डॉ. गिरीश देसाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**न्यूट्रीसोल हा नाविन्यपूर्ण आणि बहुविद्याशाखीय उपक्रम आहे. यामध्ये पोषण, मानसशास्त्र, भावनिक कल्याण, सर्जनशीलता आणि अनुभवात्मक शिक्षण एकाच ठिकाणी विद्यार्थ्यांना मिळेल. पारंपारिक पद्धतीच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभाग व संवादातून या व्यासपीठावरून विचारांची देवाणघेवाण करत शिक्षण मिळेल. न्यूट्रीसोल या उपक्रमाचा विस्तार आगामी काळात चळवळ म्हणून महाराष्ट्रभर केला पाहिजे. आजारात उपचारापेक्षा प्रतिबंध अधिक प्रभावी असते. आजची जागरूकता उद्याचा सशक्त समाज घडवते असे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे "न्यूट्रीसोल २०२६" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्‌घाटन पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पीसीयूचे प्र-कुलगुरु डॉ. सुदीप थेपडे, स्कूल ऑफ सायन्सच्या अधिष्ठाता प्रा. रुचू कूथीयाला, कुलसचिव डॉ. अनिल महेश्वरी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च प्राचार्य डॉ. दीपा नायर आदी उपस्थित होते.

यावेळी "न्यूट्रीसोल २०२६ हेल्दी लाईफ स्टाईल कॅलेंडर" चे प्रकाशन आणि स्कूल ऑफ सायन्सेस, पीसीयू आणि महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यामुळे सार्वजनिक आरोग्य, आंतरशाखीय शिक्षण आणि आरोग्य जनजागृती उपक्रमांना चालना मिळणार आहे. तसेच मानसशास्त्र व पोषण शास्त्र क्षेत्रातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्राशी प्रत्यक्ष संलग्न अनुभव संधी उपलब्ध होतील.

पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनाचे संतुलन आणि निरामय, निरोगी दीर्घायुष्य साठी आधुनिक धावपळीच्या काळामध्ये आहार आणि आरोग्याचे मापदंड पाळणे आवश्यक आहे. सर्वांगीण आरोग्य म्हणजे शारीरिक, मानसिक, भावनिक संतुलन हे आपल्या जीवनशैली वर अवलंबून आहे असे पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, व्यवस्थापन प्रतिनिधी अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे यांनी सहभागी प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### व्यक्तिमत्व शोध अन् आत्मचिंतन...

प्रास्ताविक मध्ये प्रा. रुचू कूथीयाला यांनी सांगितले की, न्यूट्रीसोल २०२६ मध्ये माहितीपूर्ण व संवादात्मक आरोग्य स्टॉल्स, मानसशास्त्र व पोषणावर आधारित उपक्रम, सहभाग वाढविणारे खेळ, थेरप्यूटिक स्ट्रीट अंतर्गत मार्गदर्शन उपचार व अनुभव, आहार तपासणी व पोषण जनजागृती, संतुलित व विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स यामुळे न्यूट्रीसोल २०२६ हा उपक्रम मन, शरीर आणि समाजासाठी सर्वांगीण आरोग्य साजरा करणारा उत्सव ठरला. अन्न साक्षरता, संतुलित आहार, प्रतिबंधात्मक आरोग्य, जागरूकता, मानसशास्त्र, भावनिक बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्त्व शोध, आत्मचिंतन या विषयांवर विविध उपक्रम सादर करण्यात आले. या उपक्रमास ३५०० विद्यार्थ्यांनी भेट दिली. रील मेकिंग, पोस्टर मेकिंग, प्रश्नोत्तरे, नाटक सादरीकरण या स्पर्धा घेण्यात आल्या या कार्यक्रमाला आयफिल इन्स्टिट्यूट, ब्राह्मणवाडी समुदाय तसेच अंगणवाडी आणि वृद्धाश्रमाचे प्रतिनिधी यांनी भेट दिली. पीसीयू - राहत क्लबच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला न्यूचेन्क, धांडे पॅथलॅब, इन बॉडी, पी अँड जी यांचे सहकार्य मिळाले.

# छत्रपती शिवरायांना १४ शाहिरांची अनोखी मानवंदना

## पिंपरी चिंचवड महापालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**"शाहिर हा महाराष्ट्राचा प्राण....गातो शिवरायांचे गुणगान जी..जी..जी.." अशी डफावर थाप पडते आणि शाहिरांच्या कंठातून बाहेर पडतात, शिवरायांचे गुणगान गाणारे स्फूर्तीदायक शब्द....अशा उत्साहपूर्ण वातावरणात नामवंत शाहिरांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना शाहिरीच्या ओजस्वी स्वरांतून मानवंदना अर्पण केली.**




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी येथील भक्ती-शक्ती समूह शिल्प उद्यान येथे आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराजांना शाहिरीतून मानवंदना' या विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने शब्दांतून उभा राहिला स्वराज्याचा दैदिप्यमान इतिहास, तालांतून झंकारली शौर्याची अखंड परंपरा आणि स्वरांतून प्रकट झाला स्वाभिमानाचा जाज्वल्य अभिमान एकप्रकारे नागरिकांनी तो अनुभवला.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, शौर्य, धैर्य आणि न्यायनिष्ठेचे प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अद्वितीय कार्याला आणि व्यापक विचारधारेला अभिवादन करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर तसेच अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या पर्वात काल सायंकाळी निगडी येथील भक्ती-शक्ती समूह शिल्प उद्यान येथे "छत्रपती शिवाजी महाराजांना शाहिरीतून मानवंदना" हा विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील शाहिरी या माध्यमातून शिवजन्मोत्सवापासून ते राज्याभिषेक सोहळ्यापर्यंतचा गौरवशाली इतिहास प्रभावी शब्दकळा, दमदार वाणी आणि प्रेरणादायी सादरीकरणातून उलगडण्यात आला. शाहीर प्रकाश ढवळे, शाहीर अशोक कामथे, शाहीर बाळासाहेब मालुसकर, शाहीर चैतन्य काजुळकर, शाहीर जालिंदर शिंदे, शाहीर लीना देशपांडे, शाहीर वनिता मोहिते, शाहीर कांचन जोशी, शाहीर प्रचिती विष्णूरकर, शाहीर स्मिता बांदिवडेकर, शाहीर चित्रा कुलकर्णी, शाहीर उज्ज्वला जाधव, शाहीर राजरत्न पांडगळे आणि शाहीर घनश्याम कुदळे यांनी आपल्या ओजस्वी शाहिरी सादरीकरणातून उपस्थितांना अक्षरशः शिवकालीन वातावरणात नेले. त्यांच्या शब्दांतून स्वराज्याची पताका, पराक्रमाची गाथा आणि राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित झाली.

या प्रेरणादायी कार्यक्रमाला महापालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते जीवन बोराडे, सागर तापकीर, निलेश शिंदे, मारुती भापकर, प्रकाश जाधव, संतोष सातपुते, आबासाहेब ढवळे, सतीश काळे, नागनाथ म्हस्के, ज्ञानेश्वर लोभे, सचिन आल्हाट, संदीप निकम, कुणाल कांबळे, सचिन बोऱ्हाडे, संदीप बोराडे, सागर लक्ष्करे, स्वप्निल शिंदे तसेच दुर्गा संजीवनी सामाजिक संस्थेचे बापूसाहेब कुतवळ, निलेश धावडे, राज साबळे, नामदेव धिंडले यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थितांनी शिवचरित्रातील आदर्श मूल्यांचा जागर पुन्हा एकदा अनुभवला. शाहिरीच्या सशक्त शब्दांमधून स्वराज्य, स्वाभिमान आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत या कार्यक्रमाने शहरातील नागरिकांच्या मनामनांत शिवविचारांची नवचैतन्यपूर्ण ज्योत प्रज्वलित केली.

# संत साई शाळेत 'मातृ-पितृ दिन' संस्कारमय वातावरणात संपन्न

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूल येथे वसंत पंचमीच्या शुभमुहूर्तावर शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी 'मातृ-पितृ दिन' हा संस्कारक्षम उपक्रम अत्यंत भक्तिभावपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. भारतीय संस्कृतीतील मातृ-पितृ पूजनाची परंपरा जपणारा हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून शाळेत सातत्याने राबविला जात आहे.**





"सर्व तीर्थमयी माता, सर्व देवमयः पिता" या मंत्रोच्चारांच्या पार्श्वभूमीवर इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचे विधिवत औक्षण करून, पायावर हळदी-कुंकू लावून, फुले अर्पण करत पूजन केले. धार्मिक मंत्रोच्चार, प्रदक्षिणा आणि आशिर्वाद या विधींमुळे शाळेचा परिसर संस्कार, श्रद्धा आणि भावनिक क्षणांनी भारावून गेला. पालकांनी आपल्या मुलांना प्रेमाने कवेत घेतलेला क्षण अनेकांच्या डोळ्यांत अश्रू आणणारा ठरला.

> आई-वडील हे प्रत्येकाच्या आयुष्यातील पहिले गुरु असून त्यांच्यापासूनच संस्कारांची खरी सुरुवात होते. केवळ पुस्तकी शिक्षण देणे हा शिक्षणाचा उद्देश नसून, विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता, नम्रता, आदर आणि संस्कृतीची जाणीव निर्माण करणे हेच खरे शिक्षण आहे. मातृ-पितृ पूजनासारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या मनावर आयुष्यभर टिकणारे संस्कार घडवतात. पालक आणि शाळा यांनी एकत्र येऊन संस्कारक्षम, सुसंस्कृत आणि जबाबदार पिढी घडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.
>
> -शिवलिंग ढवळेश्वर, संस्थापक अध्यक्ष,
> संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूल

यावेळी संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान, पिंपरी-चिंचवडचे संयोजक अजित जगताप हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी, आई-वडिलांचे स्थान आयुष्यात सर्वोच्च असून त्यांचा सन्मान व कृतज्ञता व्यक्त करणे हाच खरा संस्कार असल्याचे मत व्यक्त केले. शाळेचे संस्थापक अध्यक्ष शिवलिंग ढवळेश्वर यांनी, संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी पालकांनीही शाळेला सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन केले.

या उपक्रमाच्या माध्यमातून पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्यापेक्षा भारतीय संस्कृतीचे मोल विद्यार्थ्यांच्या मनात रुजवणे ही काळाची गरज असल्याचे शिक्षकांनी नमूद केले. मनःशक्तीवर आधारित मंत्रोच्चारांसह सूत्रसंचालन श्वेता नारायणगावकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रुपाली खोल्लम, मालन लिगाडे, रिया पोतदार, मनोज वाबळे यांचे सहकार्य लाभले. तसेच विश्वस्त पायल ढवळेश्वर तसेच पालक-शिक्षक संघाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

हा मातृ-पितृ दिनाचा कार्यक्रम विद्यार्थ्यांसह पालकांसाठीही आयुष्यभर लक्षात राहणारा, संस्कार आणि कुटुंबमूल्यांची जाणीव करून देणारा ठरला.

www.rklgis.org

RKL GALAXY™ International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

# TEACHERS' HIRING

**WALK-IN INTERVIEW**

Hiring teachers for all subjects across Pre-Primary, Primary, and Secondary sections for the academic year 2026–27.

## Walk-In Schedule Timings:

**Saturday, 21st February 2026**
**Timing: 11:00 AM to 4:00 PM**

**Monday to Friday**
**Timing: 2:00 PM to 4:30 PM**

## Venue:

RKL Galaxy International School, Sr. No. 149/5, Opp. Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune – 412105

www.rklgis.org 8698360005

